सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन -कृषि विभाग**
**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प**
**३०, आर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई- ४०० ००५.**

**दूरध्वनी क्र.**०२२-२२१६३३५१/२ **email:** mahapocra@gmail.com

जा क्र.नादेकृसंप्र-०e९८/प्र.क्र.१३६/कृषिविद्या/ बिजोत्पादन/४३५/२०१८ दिनांक-१९.१०.२०१८ २५

प्रति,
**जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी**
**(प्रकल्पातील सर्व जिल्हे)**

**विषय :- नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत हवामान अनुकूल वाणांचे पायाभूत आणि प्रमाणित बियाण्यांचे बिजोत्पादन तयार करणे या घटकाच्या मार्गदर्शक सूचना सन-२०१८-१९**

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प हा जागतिक बँक सहाय्यीत प्रकल्प मराठवाडा व विदर्भातील १५ जिल्ह्यातील ५१४२ गावांमध्ये प्रकल्प राबविणेस शासनाद्वारे मान्यता देण्यात आलेली आहे. प्रकल्प क्षेत्रातील गावसमूहातील सर्व शेतकरी लाभार्थींना बियाणे पुरवठा प्रणालीचे सक्षमीकरण करणे या घटकांतर्गत प्रकल्प क्षेत्रामधील गावांमध्ये हवामान अनुकूल वाणांचे पायाभूत आणि प्रमाणित बियाण्यांचे उत्पादन करणे (B3.1.1) ही मंजूर बाब राबविण्यासाठी सन २०१८-१९ करिता मार्गदर्शक सूचना सहपत्रित करण्यात येत आहेत.

सदर मार्गदर्शक सूचना खरीप २०१८ मध्ये महाबीज व इतर बिजोत्पादक संस्था आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांनी राबविलेल्या बिजोत्पादन कार्यक्रमासदेखील लागू असून सदर संस्थांच्या अहवालानुसार राबविलेल्या कार्यक्रमाची बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडून खात्री करून घेऊन पात्र बिजोत्पादक शेतकऱ्यांना मंजूर मापदंडानुसार अनुदान देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

**सोबत :-** वरीलप्रमाणे

**प्रकल्प संचालक**
**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई**

**प्रत - माहितीस्तव सादर**
१. सचिव, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
**माहिती व शिघ्र कार्यवाहीस्तव अग्रेषित**
१. आयुक्त, कृषि, कृषि आयुक्तालय, पुणे
२. विभागीय कृषि सहसंचालक, औरंगाबाद / लातूर / अमरावती विभाग
३. प्रकल्प संचालक, आत्मा (प्रकल्पांतर्गत सर्व)
४. उप विभागीय कृषि अधिकारी, (प्रकल्पांतर्गत सर्व)
**प्रतिलिपी:**
१. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला
२. संचालक, बीज प्रमाणीकरण यंत्रणा, अकोला
३. संचालक, संशोधन, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी /डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला/ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
४. विभागीय व्यवस्थापक, राष्ट्रीय बीज निगम, पुणे

## हवामान अनुकूल बियाणे पुरवठा प्रणालीची कार्यक्षमता वृद्धी घटकांतर्गत

# हवामान अनुकूल वाणांचे पायाभूत आणि प्रमाणित बियाण्यांचे बिजोत्पादन तयार करणे मार्गदर्शक सूचना

(प्रकल्प उपक्रम सांकेतांक-B3.1.1)

## १. प्रस्तावना:

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या माध्यमातून मराठवाड्यातील व पश्चिम विदर्भातील सर्व जिल्ह्यांबरोबरच जळगाव आणि वर्धा जिल्ह्यातील ५१४२ गावांमध्ये बदलत्या हवामानानुसार अनुकुल शेती तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यात येत आहे. यासाठी शेतक-यांना हवामान अनुकूल तंत्रज्ञानाबरोबरच पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. प्रकल्प क्षेत्रामध्ये घेण्यात येत असलेल्या प्रमुख पिकांच्या उत्पादन व उत्पादकता वाढीसाठी गुणवत्तापूर्ण बियाणांचा वापर आवश्यक आहे. यासाठी प्रकल्प क्षेत्रातील कडधान्य, तेलबिया व तृणधान्य पिकांतील बियाणे बदलाचे प्रमाण वाढवणे क्रमप्राप्त आहे. म्हणून प्रमुख पिकांच्या हवामान अनुकुल वाणांचे बियाणे शेतक-यांना उपलब्ध करण्यासाठी प्रकल्पांतर्गत विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. हवामान बदलास अनुकुल वाणांमध्ये कमी कालावधीत येणारे वाण, कीड व रोगास बळी न पडणारे किंवा प्रतिकार करु शकणारे वाण, पाण्याचा ताण सहन करणारे वाण इ. वर भर देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर बाजारपेठेच्या अनुषंगाने उत्पादित वाणाची गुणवत्तादेखील योग्य असणे आवश्यक आहे.

प्रकल्प क्षेत्रातील प्रमुख पिकांच्या बिजोत्पादन साखळीचे सक्षमीकरणाच्या उद्देशाने पैदासकार बियाण्यापासून (ब्रिडर्स सीड) पायाभूत (फाऊंडेशन) बियाणे तसेच पायाभूत बियाण्यापासून प्रमाणित (सर्टीफाईड) बियाणे तयार करण्याचा कार्यक्रम राबविण्यासाठी प्रकल्प क्षेत्रातील गावांमधील शेतकऱ्यांना “हवामान अनुकूल बियाणे वितरण प्रणालीची कार्यक्षमता वृद्धी” या उपघटकांतर्गत अर्थसहाय्य देणे प्रस्तावित आहे .

## २. उद्देश :

२.१ प्रकल्प क्षेत्रामधील गावांमध्ये प्रमुख पिकांचे हवामान अनुकूल वाणांचे बियाणे उपलब्ध करणे.

२.२ हवामान अनुकुल वाणांच्या बिजोत्पादन साखळीमध्ये छोट्या शेतक-यांचा सहभाग वाढविणे.

२.३ बिजोत्पादक शेतकरी आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांना सक्षम करून आर्थिक स्थैर्य निर्माण करणे.

## ३. हवामान अनुकूल वाणांची निवड व बिजोत्पादन कार्यक्रमाची नोंदणी:

३.१ प्रकल्प जिल्ह्यातील महत्वाची पिके विचारात घेऊन राज्यातील कृषि विद्यापीठे आणि देशांतर्गत संबधित पिकांच्या संशोधन संस्थांनी राज्यासाठी शिफारस केलेले हवामान अनुकूल वाण बिजोत्पादन कार्यक्रम आणि तंत्रज्ञान प्रसारासाठी वापरावेत अशा सूचना प्रकल्पाच्या तांत्रिक सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये देण्यात आल्या असून अशा वाणांची यादी सहपत्रित केली आहे.

याशिवाय कृषि विद्यापीठ/कृषि विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ आणि महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाचे (महाबीज) जिल्हा प्रतिनिधी यांचे तांत्रिक मार्गदर्शनानुसार आणि शेतकऱ्यांचे पसंतीनुसार इतर हवामान अनुकूल वाणांचे बिजोत्पादन कार्यक्रम राबविण्यात येणार असल्यास तशा आशयाचा प्रस्ताव प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडे मंजूरीस्तव सादर करावा आणि मंजुरीनंतर सदर वाणांचा समावेश करावा.

३.२ प्रकल्प जिल्ह्यातील प्रमुख पिकांच्या पुढीलपैकी एक अथवा अनेक हवामान अनुकूल गुणधर्म असणाऱ्या, अधिक उत्पादन देणाऱ्या आणि प्रकल्प क्षेत्रासाठी शिफारस करण्यात आलेल्या वाणांसाठीच सदर घटकांतर्गत अर्थसहाय्य देय राहील. हवामान अनुकूल गुणधर्मांमध्ये कीड-रोगास बळी न पडणारा (Tolerent/Resistant), पाण्याचा ताण सहन करु शकणारा (Moisture stress tolerant), कमी कालावधीत येणारा (Short duration), क्षाराचा ताण सहन करू शकणारा (Salt tolerant) इत्यादींचा समावेश होतो.

३.३ बियाणे कायदा, १९६८ आणि भारतीय बीज प्रमाणीकरणाची किमान मानके १९८८ व २०१३ अन्वये राज्यातील बिजोत्पादन कार्यक्रम नियंत्रित केला जातो. यासाठी महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणीकरण यंत्रणेमार्फत हंगामनिहाय बिजोत्पादन कार्यक्रम नोंदणीसाठी प्रक्रिया जाहीर केली जाते आणि बिजोत्पादकांची नोंदणी करण्यात येते.

३.४ बीज प्रमाणीकरणासाठी बियाणे विक्री परवाना असलेल्या शासकीय, सहकारी, निमशासकीय संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या तसेच वैयक्तिक शेतकरी किंवा शेतकरी गट थेट बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे नोंदणी करू शकतात.

## ४ लाभार्थी निवड व अनुदान अर्हता:

४.२ प्रकल्प क्षेत्रातील पिकांच्या हवामान अनुकुल वाणांच्या नोंदणीकृत बिजोत्पादन कार्यक्रमास सदर घटकांतर्गत अर्थसहाय्य देण्यात येईल. शासकीय, सहकारी, निमशासकीय संस्थांच्या किंवा शेतकरी उत्पादक कंपनीच्या बिजोत्पादन कार्यक्रमांतर्गत सहभागी शेतकरी तसेच थेट बीजप्रमाणीकरण यंत्रणेकडे नोंदणी करून बिजोत्पादन कार्यक्रम घेणारे शेतकरी सदर घटकांतर्गत अनुदानास पात्र असतील.

४.३ प्रकल्प क्षेत्रामध्ये पिकांच्या हवामान अनुकुल वाणांच्या बिजोत्पादनाखाली जास्तीत क्षेत्र यावे म्हणून प्रकल्पांतर्गत गावांतील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यात येणार असल्याने इच्छुक शेतकऱ्यास जमिनधारणेबाबत कोणतीही अट असणार नाही. बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे नोंदणीकृत क्षेत्रापैकी प्रत्यक्ष बिजोत्पादनाखाली असलेले क्षेत्र अर्थसहाय्यास पात्र असेल.

४.४ शेतकऱ्याकडे आवश्यक संरक्षित सिंचनस्त्रोत उपलब्ध असणे गरजेचे आहे.

४.५ इच्छुक शेतकऱ्याने बिजोत्पादानासंबधी कौशल्य प्राप्त केलेले असावे अथवा कौशल्य प्रशिक्षण घेण्याची तयारी दर्शवावी.

## ५ अर्थसहाय्यासाठी समाविष्ट बाबी:

सदर घटकांतर्गत अर्थसहाय्यासाठी खालील बाबी समाविष्ठ आहेत.

अ. बिजोत्पादकाने पायाभूत/प्रमाणित बियाणे बिजोत्पादनासाठी अदा केलेली पैदासकार / पायाभूत बियाण्याची किंमत

आ. पायाभूत/प्रमाणित बियाणे उत्पादनासाठी बीजप्रमाणीकरण यंत्रणेने आकारलेले शुल्क

सदर दोन बाबी वगळता शेतकऱ्यास बिजोत्पादनासाठी येणाऱ्या इतर खर्चापोटी प्रस्तुत उपघटकांतर्गत अर्थसहाय्य लागू राहणार नाही.

## ६ अनुदान मर्यादा

प्रस्तुत प्रकल्पांतर्गत पायाभूत/प्रमाणित बियाणे बिजोत्पादन या घटकासाठी अर्थसहाय्यासाठी समाविष्ट बाबींवरील प्रत्यक्ष खर्चाच्या १०० टक्के व कमाल रु. १५०००/- प्रती हेक्टर या मर्यादेत अर्थसहाय्य देय राहील. पायाभूत/प्रमाणित बिजोत्पादनासाठी लागणा-या पैदासकार/पायाभूत बियाण्याची किंमत ही संबधित वर्षाकरिता महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाने (महाबीज) निर्धारित केलेल्या किंमती नुसार परीगणित करण्यात यावी आणि पायाभूत/ प्रमाणित बियाणे उत्पादनासाठी नोंदणी केलेल्या क्षेत्राचे बीज प्रमाणीकरण यंत्रणेने आकारलेले एकूण शुल्क अनुदानासाठी पात्र असेल.

## ७ घटक अंमलबजावणी कार्यपद्धती

७.२ प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गावामध्ये हवामान अनुकूल वाणांचा बिजोत्पादन कार्यक्रम राबविण्याबाबत शासकीय, सहकारी, निमशासकीय संस्था, कृषि विद्यापीठ, कृषि विज्ञान केंद्र, शेतकरी उत्पादक कंपनी/ गट इ. यंत्रणा/संस्थांमार्फत जनजागृती करावी.

७.३ बिजोत्पादक संस्थांनी बिजोत्पादन कार्यक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांची बीजप्रमाणीकरण यंत्रणेकडे रीतसर नोंदणी करावी.

७.४ बिजोत्पादक संस्थांनी नोंदणीकृत शेतकऱ्यांची तपशिलासह यादी आणि नोंदणी शुल्क भरल्याचे चलनाची प्रत संबधित उपविभागीय कृषि अधिकाऱ्यांकडे सादर करावी.

७.५ उपविभागीय कृषि अधिकारी यांनी सदर यादी व नोंदणी शुल्क चलनाची प्रत पडताळणीसाठी समूह सहाय्यक/ कृषि सहाय्यकाकडे पाठवावी.

७.६ कृषि सहाय्यकांनी सदर यादीमध्ये समाविष्ट शेतकऱ्यांकडून प्रकल्पांतर्गत अर्थसहाय्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज भरून घ्यावेत आणि शेतकरीनिहाय अर्ज ग्राम कृषि संजीवनी समितीसमोर मान्यतेस सादर करावेत.

७.७ ग्राम कृषि संजीवनी समितीच्या शिफारशीने बिजोत्पादक शेतकऱ्यांचे अर्ज उपविभागीय कृषि अधिकाऱ्यांकडे तांत्रिक मान्यतेसाठी सादर करावेत. बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे केलेली नोंदणी हाच मुख्य निकष विचारात घेऊन तांत्रिक मान्यता (पूर्वसंमती) प्रदान करण्यात यावी.

७.८ बियाणे उत्पादक यंत्रणेच्या/संस्थेच्या मार्गदर्शनानुसार अर्जदार शेतकऱ्याने पैदासकार/ पायाभूत बियाणे खरेदी करून प्रत्यक्ष उत्पादन कार्यक्रम राबवावा.

७.९ पेरणीनंतर कृषि सहाय्यकांनी बिजोत्पादन प्रक्षेत्राची पाहणी करून प्रत्यक्ष बिजोत्पादन क्षेत्राचा अहवाल तयार करावा. बिजोत्पादन प्रक्षेत्राची पाहणी केल्यानंतर कृषि सहाय्यक यांनी पाहणी अहवालासोबत लाभार्थ्याचा अनुदान मागणी प्रस्ताव उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावा.

७.१० अनुदान प्रस्तावासाठी आवश्यक कागदपत्रे -

- शेतक-याने केलेल्या ऑनलाईन/ऑफलाईन अर्जाची प्रत
- पैदासकार पायाभूत/बियाणे खरेदी पावतीची मूळ प्रत
- बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीची मूळ प्रत
- ७/१२ उतारा
- शेतक-याचे हमीपत्र (उत्पादित बियाणे स्वतःच्या जबाबदारीवर विक्री करण्याबाबत आणि ना.दे.कृ.सं.प्रकल्पावर याची कोणतीही जबाबदारी राहणार नाही याबाबत)
- लाभार्थी वर्गवारीसाठी स्वतः साक्षांकित केलेली जातीच्या दाखल्याची प्रत

७.११ कृषि सहाय्याकडून प्राप्त बिजोत्पादन प्रक्षेत्र पाहणी अहवालाच्या आधारे उपविभागीय कृषि अधिकारी संबधित बिजोत्पादक शेतकऱ्याचे खात्यावर अनुज्ञेय अनुदान वर्ग करतील.

## ८. विविध स्तरावरील जबाबदारी

### ८.१. बिजोत्पादक यंत्रणा/संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी

८.१.१. प्रकल्प गावामध्ये हवामान अनुकूल वाणाचे बियाणे उत्पादनाचे महत्व शेतकऱ्यांना व ग्राम कृषि संजीवनी समितीस पटवून देणे आणि बिजोत्पादनास इच्छुक शेतकऱ्यांची निवड करणे.

८.१.२. बिजोत्पादन कार्यक्रम घेण्यास इच्छुक शेतकऱ्यांना बिजोत्पादनातील तांत्रिक बाबी तसेच कायदेशीर मानके समजावून सांगणे.

८.१.३. बिजोत्पादकांना शुद्ध बीजनिर्मितीसाठी आवश्यक कौशल्ये प्रदान करणे.

८.१.४. बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे गावनिहाय बिजोत्पादन कार्यक्रमाची नोंदणी करून नोंदणीकृत बिजोत्पादक शेतकऱ्यांची यादी तपशिलासह उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे सादर करणे.

८.१.५. बिजोत्पादा शेतकऱ्यांना हवामान अनुकूल वाणांचे स्त्रोत बियाणे पुरवठा करणे. स्त्रोत बियाण्याच्या आणि बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे भरलेल्या शुल्काच्या पावत्या शेतकऱ्यांना देणे.

८.१.६. बिजोत्पादक शेतकऱ्यांबरोबर उत्पादित बियाणे खरेदी करण्याबाबत करार करणे.

८.१.७. पेरणीनंतर बिजोत्पादन प्रक्षेत्राचे पाहणीचे वेळी कृषि सहाय्यक / समूह सहाय्यकांचे सोबत उपस्थित राहणे.

८.१.८. प्रकल्पांतर्गत अर्थसहाय्यासाठी शेतकरीनिहाय अनुदान प्रस्ताव तयार करण्यास संबधित कृषि सहाय्यक/ समूह सहाय्यक यांना सहकार्य करणे.

## ८.२. लाभार्थी

८.२.१. बिजोत्पादन कार्यक्रम राबविण्यासाठी बिजोत्पादन यंत्रणा/संस्था/ शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे नोंदणी करणे.

८.२.२. बिजोत्पादनासाठी नोंदणीकृत शेतकऱ्यांनी समूह सहाय्यकाच्या मदतीने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या संकेतस्थळावर नाव नोंदणी करणे व प्रकल्पांतर्गत अर्थसहाय्यासाठी ग्राम कृषि संजीवनी समिती (VCRMC) कडे विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र-१) आवश्यक कागदपत्रासह सादर करणे.

८.२.३. पायाभूत/प्रमाणित बिजोत्पादन कार्यक्रमासाठी बिजोत्पादन यंत्रणा/संस्था/शेतकरी उत्पादक कंपन्या यांचेशी आवश्यक करार करून प्रस्तुत मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद हवामान अनुकूल वाणांचे स्त्रोत बियाणे उपलब्ध करुन घेणे.

८.२.४. बिजोत्पादनासंबंधी बीज प्रमाणीकरण यंत्रणेस व बिजोत्पादन यंत्रणा/संस्थेस पिकाच्या वाढीच्या विविध टप्प्यांबाबतची माहिती कृषि सहाय्यक/समूह सहाय्यक यांचे मार्फत वेळोवेळी कळविणे.

८.२.५. बीज प्रमाणीकरण नियमानुसार आवश्यक त्या अटी व शर्तींचे पालन करणे .

८.२.६. पैदासकार/पायाभूत बियाणे खरेदीची पावती आणि बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे भरलेल्या शुल्काची पावती अनुदान प्रस्तावासोबत सादर करणे.

८.२.७. हवामान अनुकूल वाणांचे बियाणे वापरण्यास इतर शेतकऱ्यांना प्रवृत्त करणे.

## ८.३. ग्राम कृषि संजीवनी समिती (VCRMC)

८.३.१. पायाभूत प्रमाणित बिजोत्पादन कार्यक्रमासाठी /बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे रितसर नोंदणी करण्यासाठी गावातील शेतकऱ्यांना प्रवृत्त करणे आणि अशा इच्छुक शेतकऱ्यांना प्रकल्पांतर्गत उपलब्ध अर्थसहाय्याबद्दल माहिती देणे.

८.३.२. नोंदणीकृत बिजोत्पादक शेतकऱ्यांनी प्रकल्प अर्थसहाय्यासाठी केलेले अर्जांची व अनुषंगिक कागदपत्रांची कृषि सहाय्यक यांचे मदतीने छाननी करून उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे तांत्रिक मान्यतेसाठी शिफारस करणे.

८.३.३. हवामान अनुकूल वाणांचे बियाणे वापरण्यास गावातील शेतकऱ्यांना प्रवृत्त करणे.

८.३.४. अंमलबजावणी करण्यात आलेल्या बाबींचे सामाजिक लेखापरीक्षण करणे.

८.३.५. अत्यल्प व अल्पभूधारक बिजोत्पादक शेतकऱ्यांना प्रकल्पांतर्गत उपलब्ध इतर वैयक्तिक लाभाच्या बाबींसाठी त्यांचे गरजेनुसार प्राधन्य देणे.

## ८.४. समूह सहाय्यक

८.४.१. बिजोत्पादक यंत्रणा/ संस्था/ शेतकरी उत्पादक कंपन्यांबरोबर समन्वय ठेऊन गाव समूहामधील शेतकऱ्यांना बियाणे बदलाचे महत्व आणि बिजोत्पादन कार्यक्रमाचे फायदे समजावून सांगणे.

८.४.२. बिजोत्पादन कार्यक्रमात सहभागी होण्यास इच्छुक शेतकऱ्यांना प्रकल्पाच्या संकेत स्थळावर नोंदणी व अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन व मदत करणे.

८.४.३. शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी व शेतकऱ्यांने सादर केलेली कागदपत्रे कृषि सहाय्यक यांचे छाननीनंतर ग्राम कृषि संजिवनी समितीपुढे सादर करणे.

८.४.४. शेतकऱ्यांस योजनेच्या अटी व शर्ती तसेच घटकाबाबतचे आर्थिक व तांत्रिक निकष समजावून सांगणे. प्रकल्प स्थळाचे भौगोलिक स्थानांकन (Geo tagging) करण्यास कृषि सहाय्यक यांना मदत करणे.

८.४.५. लाभार्थी व तपासणी अधिकारी यांचे समवेत अंमलबजावणी पूर्वी व अंमलबजावणी नंतर प्रकल्प स्थळाचे अक्षांशरेखांश/सह फोटो काढावेत. सदरचे फोटो प्रकल्पाच्या संगणक प्रणालीवर अपलोड करावेत. (स्थळ पाहणी व मोका तपासणी वेळेस)

## ८.५. कृषि सहाय्यक

८.५.१. बिजोत्पादक यंत्रणा/ संस्था/ शेतकरी उत्पादक कंपन्यांबरोबर समन्वय ठेऊन गाव समूहामधील शेतकऱ्यांना बियाणे बदलाचे महत्व आणि बिजोत्पादन कार्यक्रमाचे फायदे समजावून सांगणे.

८.५.२. बिजोत्पादन कार्यक्रमात सहभागी होण्यास इच्छुक शेतकऱ्यांना प्रकल्पाच्या संकेत स्थळावर नोंदणी व अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन व मदत करणे.

८.५.३. बिजोत्पादक यंत्रणेकडून / शेतकरी उत्पादक कंपनीकडून उपविभागीय कृषि अधिकारी यांचेमार्फत प्राप्त माहितीनुसार बिजोत्पादकांचा तपशील, स्त्रोत बियाणे खरेदीची पावती, बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे भरलेले शुल्क, ७/१२ उतारा इ. बाबतचा तपशिल व अनुषंगीक बाबींची पडताळणी करणे.

८.५.४. ग्राम कृषि संजीवनी समितीस बिजोत्पादन कार्यक्रमासाठी इच्छुक शेतकऱ्यांचे अर्जांची छाननी करण्यास व योग्यतेनुसार उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे शिफारस करण्यास मदत करणे.

८.५.५. बिजोत्पादनासाठी नियोजित क्षेत्राची पाहणी करून विहीत प्रपत्रात अहवाल आणि लाभार्थ्याचा अनुदान मागणी प्रस्ताव शिफारशीसह उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे सादर करणे.

८.५.६. बीज प्रमाणीकरण यंत्रणेमार्फत बिजोत्पादन क्षेत्रास भेटीचे वेळी उपस्थित राहून आवश्यक ते सहकार्य करणे.

## ८.६. उपविभागीय कृषि अधिकारी

८.६.१. प्रकल्प उद्देशास अनुसरून निवडलेल्या गावसमूहामध्ये बियाणे बदलाचे प्रमाण वाढवणे, हवामान अनुकूल वाणांचे बियाण्याची उपलब्धता वाढवणे, बिजोत्पादन उपक्रमास प्रोत्साहन देणे आणि महाबीज/ शेतकरी उत्पादक कंपन्यांमार्फत बियाणे उत्पादन व पुरवठा प्रणाली सक्षम करणे ही उद्दिष्ट्ये समोर ठेऊन बिजोत्पादन कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी करणे.

८.६.२. बिजोत्पादन यंत्रणा/ संस्थांमार्फत गाव/गावसमुह निहाय बिजोत्पादन कार्यक्रमाची बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडून नोंदणी करून घेणे.

८.६.३. नोंदणीकृत बिजोत्पादकांची कृषि सहाय्यक/ समूह सहाय्यक यांचेमार्फत पडताळणी करून घेणे.

८.६.४. ग्राम कृषि संजीवनी समितीच्या शिफारशीसह अर्ज प्राप्त झाल्यानंतर शेतकरीनिहाय तांत्रिक मान्यता (पूर्वसंमती) देणे.

८.६.५. बिजोत्पादन संस्थांकडून नोंदणीकृत शेतकऱ्यांना हवामान अनुकूल वाणांचे स्त्रोत बियाणे उपलब्ध केले जाईल याबाबत खात्री करणे.

८.६.६. संबधित गावांचे कृषि सहाय्यक/समूह सहाय्यक यांना बिजोत्पादनाबद्दल वेळोवेळी मार्गदर्शन करणे.

८.६.७. कृषि सहाय्यकांनी केलेल्या प्रक्षेत्र तपासणीबाबत अहवाल प्राप्त झाल्यानंतर निधी उपलब्धतेनुसार थेट संबधित लाभार्थ्याचे बँक खात्यावर अनुदान हस्तांतरण करणे.

८.६.८. उपविभागांतर्गत राबविलेल्या बिजोत्पादन कार्यक्रमाची २% तपासणी करणे.

# ९. निधीची तरतूद:

प्रकल्पाचे घटक आणि उपघटक सांकेतांक B3.1.1 खाली सदर बाबीचा खर्च करण्यात यावा. सन २०१८-१९ करिता खरीप व रब्बी हंगामासाठी रु. ३००/- लक्ष इतकी तरतूद करण्यात आली आहे.

## प्रकल्प जिल्ह्यांसाठी शिफारस केलेले हवामान अनुकूल वाण

| पिकाचे नाव | कृषि विद्यापिठनिहाय हवामान अनुकूल वाण | | |
|---|---|---|---|
| | वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी | डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला | महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी |
| कापूस (Arborium) | PA २५५, PA ५२८ | AK २०५-३ | JLA ५०५ |
| | | AKA-५, AKA-७, AKA-८ | |
| कापूस (Hirsutum) | NH ६१५ | AKH -९९१६, AKH -०८१ | - |
| कापूस (संकरीत) | NHH २५० (Non BT)<br>NHH ४४ (BT) | JKAKL- ११६ (BT), PKV Hy २ (BT) | - |
| कापूस (बीटी) | NH ६१५ | रजत, AKH ०८१, AKH ९९१६ | - |
| | CICR वाण: LRA ५१६६, LRK ५१६ | | |
| सोयाबीन | MAUS-६१२, MAUS १५८, MAUS ७१, MAUS १६२ | AMS-१००१ | DS २२८, फुले अग्रणी |
| | महाबीज वाण: JS २०२९, JS ९३०५, JS ३३५ | | |
| तूर | BDN ७१६ | AKPHM -११३०३ (संकरीत)<br>AKT-८८११ (सुधारित वाण) | विपुला |
| | BDN ७११, BSMR ७३६, BDN ७१६ | PKV Tara | |
| | | ICP ८८६३, ICPL ८७११९ | |
| मूग | BM २००३-२,<br>BM २००२-१ | AKM १२-१८, AKM८८०२, PKV AKM- ४ | |
| | महाबीज वाण :Utkarsh (Mahabeej) | | |
| उडीद | - | PDKV Black Gold, TAU १, AKU-१०-१, AKU-१५ | - |
| हरभरा | आकाश, BDN ७९८ | जाकी ९२१८, पी के व्ही काबुली ४-१ | फुले विक्रम ,फुले विक्रांत , दिग्विजय, विराट, विजय, कृपा |
| | इतर कृषि विद्यापीठ / संशोधन संस्था : राज विजय-२०२, राज विजय-२०३ | | |
| रबी ज्वारी | परभणी मोती, परभणी ज्योती | पी के व्ही क्रांती | फुले वसुधा, फुले अनुराधा, फुले चित्रा, फुले रेवती, मालदांडी |

***टीप :*** *कृषि विद्यापीठ व महाबीज यांचे सल्ल्यानुसार उपरोक्त वाणांचे व्यतिरिक्त इतर हवामान अनुकूल वाणांचा बिजोत्पादन कार्यक्रम घेता येईल. त्यासाठी सदर वाणांचे वैशिष्ठ्यांसह प्रस्ताव प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडे मंजूरीस्तव सादर करावा*

# प्रपत्र-१

## प्रकल्पांतर्गत लाभासाठी निवड होणेकरिता अर्ज व हमीपत्र

## जागतिक बँक अर्थसहाय्यित

## नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प

(प्रत्येक घटकासाठी स्वतंत्र अर्ज करावा)

**प्रति,**

**मा. अध्यक्ष, ग्राम कृषि संजीवनी समिती ........................... (अर्जदाराचे गाव) ..................................**

**गावसमूह क्रमांक....................................तालुका ................................ जिल्हा ................................**

**महोदय,**

जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत मी, माझ्या मालकीहक्काचे शेत जमिनीमध्ये हवामान बदलास पुरक पध्दतीने शेती करण्यासाठी गुंतवणूक करणेस तयार आहे, त्याकरिता या प्रकल्पांतर्गत खालील घटकाचा लाभ मिळावा, ही विनंती.

**मागणी केलेल्या घटकाचे नाव-.............................................................**

**घटकाचा तपशील[१].-......................................................................**

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १. | अर्जदार शेतकऱ्यांचे संपूर्ण नाव | (आडनाव) (प्रथम नाव ) (वडीलाचे नाव )<br>........................ .............................. .......................... |
| २. | पूर्ण पत्ता | घर क्र. ............... गल्ली क्र./भागाचे नाव .....................<br>गाव.............................. पोस्ट..................................<br>तालुका............................ जिल्हा..............................<br>पिन क्र.- ☐☐☐☐☐☐ |
| ३. | भ्रमणध्वनी क्रमांक-[२] | ☐☐☐☐☐☐☐☐☐☐ |
| ४. | स्त्री/पुरुष(लागू असेल तेथे √ अशी खूण करावी) | स्त्री ☐ पुरुष ☐ |
| ५. | जात प्रवर्ग (लागू असेल तेथे √अशी खूण करावी) | अ.जा. अ.ज. इतर |
| ६. | अर्जदार दिव्यांग आहे काय?( लागू तेथे √ खूण करावी) | होय ☐ नाही ☐ |
| ७. | दारिद्र्य रेषेखालील असल्यास - यादीतील अ.क्र[३]. | ☐☐☐☐☐☐☐☐ |

---

[१] या मध्ये अनुदान मागणी केलेल्या घटकाचा तपशील उदा. शेततळ्याचा आकार, हरितगृहाचा/शेडनेटचा आकार, फळबाग लागवड असल्यास फळपिक नाव, क्षेत्र इ. तसेच ठिबक, तुषार असल्यास- पिकाचे नाव-क्षेत्र इ. तपशील नमूद करावा.

[२] प्रकल्पाच्या विविध घटकातील माहितीची देवाण-घेवाणीसाठी भ्रमणध्वनी क्रमांकाचा प्रकल्पाच्या कामकाजासाठी वापर करण्यास माझी सहमती आहे.

[३]दारिद्र्य रेषेखालील दाखला सोबत जोडण्याची आवश्यकता नाही. तथापि ग्राम कृषि संजीवनी समिती लाभार्थी निवड करतेवेळी अर्जदार दारिद्र्य रेषेखालील असल्याबाबत खात्री करून अर्जाबाबत उचित निर्णय घेऊ शकेल.

| | | |
|---|---|---|
| ८. | आधारकार्ड क्र.[४] | ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ |
| ९. | स्वत:च्या नावावरील एकूण क्षेत्र (८-अ प्रमाणे) | खाते क्र............................<br>एकूण जमिनधारणा ☐ (हेक्टर) ☐ (आर) |
| १०. | आरटीजीएस सुविधा असणाऱ्या बँकेचे नाव | |
| | खाते क्रमांक- | ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ |
| | बँकेची शाखा- | |
| | आयएफएससी कोड- | ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ |
| ११. | घेत असलेली पिके- | |
| १२. | ज्या क्षेत्रावर घटक राबविणार आहे त्या क्षेत्राचा सर्व्हे/गट क्रमांक- | क्षेत्र \| गाव \| तालुका |
| १३. | यापूर्वी याच घटकाचा लाभ आपण अथवा आपल्या कुटुंबातील[५] अन्य सदस्यांनी या किंवा इतर योजनेतून घेतला आहे काय? असल्यास लाभ घेतलेली योजना,अनुदान रक्कम व लाभ घेतलेचे वर्षे इ.तपशील . | |
| १४. | मागणी केलेल्या घटकाचा एकूण अंदाजित खर्च. | रक्कम रुपये............................. |
| १५. | निकषानुसार अपेक्षित अनुदान | रक्कम रुपये............................. |
| १६. | अनुदान वजा जाता उवर्रित रक्कम कशा प्रकारे उभारणी करणार ? (लागू असेल तेथे √अशी खूण करावी) | स्वत: ☐ बँक कर्जाव्दारे ☐ |

सदर घटकासाठी माझी निवड झाल्यास आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करुन विहीत मुदतीत प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार तसेच प्रकल्प आधिकाऱ्यांच्या तांत्रिक देखरेखीखाली काम पूर्ण करीन व त्यानंतरच मला अनुदान देय राहील तसेच .सदरचे काम मी विहित मुदतीत व मार्गदर्शक सुचनेप्रमाणे पूर्ण न केलेस अनुदान मिळणार नाही, याची मला जाणीव आहे.

सदर बाबीचा लाभ घेत असताना वा त्यानंतर माझेकडुन गैरव्यवहार झाल्याचे आढळून आल्यास अथवा लाभांकित बाबीचा माझ्याकडुन गैरवापर झाल्याचे सिद्ध झाल्यास संबधित घटकासाठी मिळालेले अनुदान माझ्याकडून सव्याज वसुल केले जाईल याची मला स्पष्ट जाणीव आहे.

प्रकल्पाचे अधिकारी आणि इतर प्राधिकृत व्यक्तींना घटक तपासणीसाठी माझी संमती आहे तसेच, त्यांना या तपासणी कामासाठी सहकार्य करेन.

वरील सर्व माहिती माझ्या समजुतीप्रमाणे बरोबर व खरी आहे.

**स्थळ:- (गावाचे नाव).............................**

**दिनांक- / / २०--** **अर्जदार शेतक-याची सही/अंगठा**

---

कोठेही जतन अथवा सामाईकीकरण )share) केली जाणार नसून ती फक्त सी आय डी आर (Central Identities Data Repository) कडे पडताळणी करता सादर केली जाईल.

कुटुंब या व्याख्येत पती, पत्नी व १८ वर्षाखालील मुलांचा समावेश राहील.

प्रपत्र-२

## पूर्वसंमती पत्र

जा.क्र. _____________
कार्यालय - उपविभागीय कृषि अधिकारी, _______
जिल्हा _________
दिनांक - ____/____/______

**प्रति,**
**श्री/श्रीमती ______________________________________**

**मु.पो. _________, तालूका ,____________ जिल्हा _____________**

आपला दिनांक ____/____/२०__ रोजीचा अर्ज ग्राम कृषि संजीवनी समितीने (VCRMC) दि____/____/______ रोजीच्या ______ क्रमांकाच्या ठरावाने मंजूर केला आहे. आपल्या अर्जानुसार, आपले नावावर ८-अ प्रमाणे ______ हे. क्षेत्र असून यापैकी सर्व्हे नं./गट नं. _______मधील ______ हे. क्षेत्रावर ----------------या पिकाच्या . . . . . . . . . . . . या वाणाच्या प्रमाणित/पायाभूत बियाण्याच्या उत्पादनासाठी २०१८-१९ मध्ये बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे केलेल्या नोंदणीच्या अधिन राहून पूर्वसंमती देण्यात येत आहे.

हवामान अनुकुल वाणाचे पायाभूत किंवा प्रमाणित बियाण्यांचे उत्पादन घेण्यासाठी बिजोत्पादक संस्था व बीज प्रमाणीकरण यंत्रणा यांचे मार्गदर्शनानुसार कारवाही करण्यात यावी. बिजोत्पादनासाठी खरेदी केलेल्या पैदासकार/पायाभूत बियाणेकरिता अदा केलेली किंमत( महाबीजचे दरानुसार) आणि प्रमाणीकरण यंत्रणेचे शुल्क या दोन बाबींवर प्रत्यक्ष झालेल्या खर्चाच्या अधिन राहून आपला प्रस्ताव अनुदानासाठी पात्र राहिल याची नोंद घ्यावी. आपला प्रस्ताव मंजूर झाल्यास आपणास शासन निर्णयानुसार (मार्गदर्शक सुचना व मंजूर मापदंड इत्यादी) अनुज्ञेय अनुदान निधी उपलब्धतेनूसार मंजूर करण्यात येईल. तसेच सदरचे अनुदान आपल्या बँक खात्यावर DBT द्वारे जमा करण्यात येईल. आपल्या प्रकल्प प्रस्तावास मंजूरी देणे, देय अनुदानाची रक्कम/देय कालावधी इत्यादी बाबी ठरविण्याचा अंतिम अधिकार नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प/शासनाचा राहिल.

**उपविभागीय कृषि अधिकारी,**
**उपविभाग: _______**
**जिल्हा: __________**

**प्रत ,**

माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित,

१) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी-------------
२) अध्यक्ष, ग्राम कृषि संजीवनी समिती-------------

## प्रपत्र – ३
## (बिजोत्पादन प्रक्षेत्र पाहणी व पात्रतेबाबत अभिप्राय-कृषि सहाय्यक)

श्री/ श्रीमती-----------------------------------------मु. पो.------------------ता.---------जि.------------------- यांनी त्यांचे मालकीचे स.नं./गट नं. ------------मधील एकूण क्षेत्र --------------(हे. आर.) पैकी -------------(हे. आर.) क्षेत्रावर नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत हवामान अनुकूल वाणांचे पायाभूत आणि प्रमाणित बियाण्यांचे बिजोत्पादन तयार करणे या घटकासाठी अर्ज केलेला आहे. बियाण्याच्या उत्पादनासाठी दिनांक -----------रोजी बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे केलेल्या नोंदणीच्या आधारे सदर अर्ज ग्राम कृषि संजीवनी समितीने (VCRMC) दिनांक -------रोजीच्या बैठकीमध्ये मंजूर केलेला आहे. दिनांक --------------- रोजी भेट देऊन बिजोत्पादन प्रक्षेत्राची लाभार्थी समक्ष पाहणी केली असता.........हे. क्षेत्रावर लाभार्थ्याने बिजोत्पादक संस्था व बीज प्रमाणीकरण यंत्रणा यांचे मार्गदर्शनानुसार स्त्रोत बियाण्याची पेरणी केलेली आहे.

| अ क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १. | बिजोत्पादन क्षेत्राचा सर्वे नं./गट नं. | |
| २. | पिकाचे नाव | |
| ३. | पिकाचे वाण | |
| ४. | स्त्रोत बियाण्याचा प्रकार | पैदासकार / पायाभूत |
| ५. | स्त्रोत बियाणाची पेरणी केल्याचा दिनांक | |
| ६. | लाभार्थीने मागणी केलेल्या बिजोत्पादनासाठीचे एकूण क्षेत्र | .................हे. ...........आर |
| ७. | शेतामध्ये स्वमालकीच्या विहीर/बोअरवेल/इतर सिंचन सुविधा उपलब्ध आहे काय? | होय /नाही |

उपरोक्त लाभार्थ्याने अर्जासोबत सादर केलेल्या क्षेत्र गट नं./सर्वे नं.-------मध्ये --------- हे. क्षेत्र असून यापैकी सर्व्हे नं./गट नं. _______मधील ______ हे. क्षेत्रावर ---------------- पिकाच्या -------------- या वाणाच्या प्रमाणित/पायाभूत बियाण्याच्या उत्पादनासाठी घेतलेले आहे. सदर उपक्रमासाठी खरेदी केलेल्या स्त्रोत बियाण्याचा खर्च व बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे भरलेले शुल्क या बाबींची पडताळणी केलेली आहे. वरील सर्व बाबी विचारात घेऊन सदर लाभार्थी अर्थसहाय्यासाठी पात्र आहे.

**ठिकाण -**
**दिनांक -**

**(स्वाक्षरी)**
**कृषि सहाय्यक**
**नाव.........................**
**सजा .......................**
**ता. .........................**
**जि. .........................**

(टीप-कृषि सहाय्यक यांनी उपरोक्त क्षेत्र तपासणी अहवाल भौगोलिक चिन्हांकनासह (Geo-tagging) द्यावा.)

**प्रपत्र – ४**

**(लाभार्थी अनुदान मागणी पत्र)**

**प्रती,**

उपविभागीय कृषि अधिकारी,

उपविभाग _________

जिल्हा: _________

**विषय :- नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत देय अनुदान मिळणेबाबत.**

मी श्री./ श्रीमती.................................................................मु. ..................... पो. .......................... ता............... जि............... आपणास मागणी करतो की, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत हवामान अनुकूल वाणांचे पायाभूत / प्रमाणित बियाण्यांचे बिजोत्पादन घटकासाठी बिजोत्पादक संस्था व बीज प्रमाणीकरण यंत्रणा यांचे मार्गदर्शनानुसार स्त्रोत बियाण्याची पेरणी केलेली आहे. बियाणे पेरणीपश्चात संबधित कृषि सहाय्यक यांनी प्रक्षेत्र पाहणी केलेली आहे. स्त्रोत बियाणे खरेदीची पावती, बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे बिजोत्पादन कार्यक्रमाची भरलेली शुल्क पावती सोबत जोडलेली आहे, तरी मला नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत हवामान अनुकूल वाणांचे पायाभूत / प्रमाणित बियाण्यांचे बिजोत्पादन या घटकांतर्गत आर्थिक निकषानुसार देय अनुदान मिळावे. ही विनंती

**दिनांक :** **लाभार्थीची स्वाक्षरी**

**(नाव व पत्यासह)**

सोबत –

१. स्त्रोत बियाणे खरेदी पावतीची मूळप्रत

२. बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे बिजोत्पादन कार्यक्रमाची भरलेली शुल्क पावती

## प्रपत्र -५
## पर्यवेक्षीय तपासणी अहवाल

| | | | |
|---|---|---|---|
| १. | तपासणी दिनांक | | |
| २. | तपासणी अधिकारी | श्री/श्रीमती | |
| ३. | पदनाम | | |
| ४. | तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी/कर्मचारी | १. श्री/श्रीमती<br>पदनाम<br>२. श्री/श्रीमती<br>पदनाम | |
| ५. | लाभार्थ्याचे नाव | सर्वे नं./गट न. __________<br>वर्गवारी: _____________<br>(अ.जा./अ.ज./सर्वसाधारण/इतर) ___________<br>मु.पो. ______________________<br>ता. __________ उपविभाग ___________<br>जि. _________ | |
| ६. | बाब | हवामान अनुकूल वाणांचे पायाभूत आणि प्रमाणित बियाण्यांचे बिजोत्पादन तयार करणे | |
| ७. | प्रकल्पाचे ठिकाण | | |
| ९. | बिजोत्पादक संस्थेचे नाव | | |
| १०. | प्रकल्पाचा सविस्तर तपशील | १. प्रकल्प क्षेत्राचा सर्व्हे नंबर/गट क्र. _________<br>२. एकूण बिजोत्पादन क्षेत्र ------------हे.-----आर.<br>३. पिकाचे नाव ---------------वाण ---------------<br>४. स्त्रोत बियाणे पेरणी केल्याचा दिनांक ---------------- | |
| ११. | लाभार्थ्यास देय अर्थसहाय्याची रक्कम रु. | | |
| १२. | तपासणी मध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली आहे काय ? | | होय/नाही |
| | नसल्यास तफावत रक्कम रु. | | |
| १३. | मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ? | | होय/नाही |
| १४. | लाभार्थ्याचे सर्वसाधारण अभिप्राय | | |

| | |
|---|---|
| | |
| १५. | गुणवत्तेबाबत तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय |
| | |

तपासणी अधिकारी, श्री.
पदनाम.
(स्वाक्षरी)

इतर अधिकारी श्री.
पदनाम.
(स्वाक्षरी)

लाभार्थ्याची/ लाभार्थी प्रतिनिधीची स्वाक्षरी
(नाव..............................)